Rayat Shikshan Sanstha's

Rajarshi Chhatrapati Shahu College, Kolhapur

Department of Sociology

# Visit to Cradle House (Fulora)

Date : 3/10/2017





RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE KOLHAPUR

2023/02/08 16:18

# अहवाल

## समाजशास्त्र विभागाची पाळणा घरास सदिच्छा भेट

राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने सदर बाजार येथील फुलोरा या पाळणा घरास विद्यार्थ्यांनी दि. ३/१०/२०१७ रोजी भेट दिली. सदर भेटीमध्ये संस्थेच्या संस्थापिका श्रीमती अपर्णा दिवाकर वाटवे यांनी विद्यार्थ्यांना पाळणा घराविषयी सविस्तर माहिती दिली. या संस्थेची स्थापना १९८७ मध्ये झाली असून तीन महिन्यापासून पंधरा वर्षापर्यंतची मुले व मुली या पाळणा घरामध्ये राहतात. विविध ठिकाणी कार्यरत असणा-या पालकांनी आपली मुले या पाळणा घरामध्ये ठेवलेली आहेत. त्यांना गिता शिंदे, माला मालगे व सविता कुंभार यांच्याकडून पाळणा घरातील मुलांचें संवर्धन केले जाते. त्यांच्या या शैक्षणिक संस्कारातूनच मुलांच्यामध्ये चांगल्या गुणांची जोपासणा होत आहे. पाळणा घरामध्ये प्रवेश घेण्यासाठी विशेष नियमावली करण्यात आलेली आहे. पाळणा घरामध्ये पालकांच्या वेळेनुसार मुलांना ठेवण्याची व्यवस्था करण्यात आलेली दिसून येते. या पाळणा घरात डॉक्टर, इजिनिअर, शिक्षक यासारखे पदाधिकारी घडलेले आहेत. सदर भेटीमध्ये समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांनी संस्थेच्या संस्थापिका आणि शिक्षकाशी चर्चा करुन पाळणा घरातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या भेटीतून विद्यार्थ्यांच्यामध्ये बालसंगोपणाच्या बाबतीत आणि जबाबदारीची जाणीव जागृत झाली. या उपक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. राजेंद्र कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सदर भेटीचे नियोजन समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. नदाफ बी.आर.व त्यांचे सहकारी कन्नाडे एम. के. यांनी केले. सदर भेटीसाठी विभागातील सर्व (१५) विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

RAJARSHI CHHATRAPATI SHAHU COLLEGE ★ KOLHAPUR

Head
Department of Sociology
...arshi Chh. Shahu College, Kolhapur.

दै. तरुण भारत

# समाजशास्त्र विभागाची पाळणा घरास सदिच्छा भेट

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय येथील समाजशास्त्र विभागाच्या वतीने सदर बाजार येथील फुलोरा या पाळणा घरास विद्यार्थ्यांनी भेट दिली. सदर भेटीत संस्थेच्या संस्थापिका अपर्णा वाटवे व शिक्षकांशी विद्यार्थ्यांनी चर्चा करून पाळणा घराविषयी सविस्तर माहिती घेतली, तसेच पाळणा घरातील समस्या जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या पाळणा घरात गिता शिंदे, माला मालगे, सविता कुंभार यांच्याकडून मुलांचे संगोपन केले जाते. येथे प्रवेशासाठी विशेष नियमावली बनविण्यात आली आहे. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्र कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी समाजशास्त्र विभाग प्रमुख प्रा. बी. आर. नदाफ, प्रा. एम. के. कन्नाडे, तसेच पाळणा घरातील शिक्षिका उपस्थित होत्या.

2023/02/08 16:19